24-04-2025-Dai-04ff_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/23/2025 11:09 PM Page 1

निवडक

बोरी येथील गोपाळकृष्ण मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त आजपासून कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि. २३ : बोरी देऊळवाडा येथील श्री गोपाळकृष्ण मंदिर ट्रस्टतर्फे श्री गोपाळकृष्ण मुर्ती प्रतिष्ठापना दिन दि. २४ व दि. २५ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात येईल, असे श्री गोपाळकृष्ण मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुदेश नाईक यांनी सांगितले सदर मूर्ती प्रतिष्ठापनेचा १६वा वर्धापनदिन असून सर्वांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

दोन दिवसांच्या सोहळ्याची सवीस्तर माहिती सचीव प्रमोद च्यारी यांनी सांगितली. गुरुवार दि २४ रोजी सकाळी ८ वाजता गणपती पूजन, शुद्धीकरण, देवाला अभिषेक, आरती, संध्याकाळी स्थानिक भजनी कलाकारांतर्फे भजन ७.३० वाजता पालखी ८.३० वाजता श्री नवदुर्गा गोपाळकृष्ण महिला मंडळ बोरी व शिवांजली नृत्य अकादमी यांच्या तर्फे सांस्कृतिक कार्यक्रम दि २५ रोजी सकाळी ९ वाजता गणेशपूजन, पुण्याहवाचन, देवता स्थापन, विष्णू याग, देवास अभिषेक, पुर्णाहुती, आरती व महाप्रसाद, कार्यक्रमाचे यजमान श्री. व सौ. खुशबु सतिश नाईक आणि कुटुंबिय संध्याकाळी ६ वाजता भजन ७ वाजता पालखी महाआरती व ९.३० वाजता नाट्य प्रयोग शनिवार दि. २६ रोजी फोंडा तालुका मर्यादित नाट्यगित गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदर सोहळ्याचा आनंद तिर्थप्रसादाचा आशिर्वादाचा लाभ घ्यावा, असे सचिव प्रमोद च्यारी यांनी केले आहे.

कबड्डी संघासाठी २६ रोजी डिचोलीत निवड चाचणी

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २३ : हौशी कबड्डी असोसिएशन ऑफ गोवा मुले आणि मुलींचा संघ ९ ते १२ मे दरम्यान महाराष्ट्र राज्यातील वर्धा जिल्ह्यातील देओली टाउन येथे होणाऱ्या ज्युनियर राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद २०२५ मध्ये सहभागी होत आहे.ही स्पर्धा कबड्डी असोसिएशन विदर्भ संघाने हौशी कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे.

या संदर्भात, गोवा ज्युनियर मुले आणि मुली संघाची निवड चाचणी शनिवार दि. २६ रोजी संध्याकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मैदान डिचोली येथे आयोजित केली जाईल. ९ मे रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले सर्व मुले आणि मुली, ७० किलो वजनाचे मुले आणि ६५ किलो वजनाचे मुली, निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत.संभाव्य ज्युनियर मुले आणि मुली संघासाठी प्रशिक्षण शिबिर २७ एप्रिल ते ६ मे दरम्यान आयोजित केले जाईल. सर्व ज्युनियर कबड्डी खेळाडूंना जन्म प्रमाणपत्र आणि आधार कार्डसह निवड चाचण्यांमध्ये उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी ९५२९७२१५२४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष सिद्धेश भेंडाळकर, जनरल सेक्रेटरी अजित सामंत व खजिनदार शिवानंद पळ यांनी केले आहे.

खेळाडूंनी निवड समितीचे अध्यक्ष मॅन्युएल फर्नांडिस, सदस्य भानुदास परब गावकर यांच्याशी संपर्क साधावा अशी विनंती आहे.

शिवोलीत आज 'आत्या आत्या माका सून कर'

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २३ : शिवोली येथील श्री देवी कालिका देवस्थानच्या ६४व्या वर्धापनदिन सोहळ्यात गुरुवार २४ रोजी रात्री १०.३० कोकणी नाटक 'आत्या आत्या माका सून कर ' नाटक होणार आहे.

या निमित्त सकाळी धार्मिक विधी होईल. रात्री ९.३० वाजता श्रींची पालखीतून मिरवणुक, आरती तीर्थप्रसाद रात्री १०.३० वाजता ब्राह्मण बाल हौशी नाट्य मंडळातर्फे लिखित महेश नाईक व उदय ताम्हणकर दिग्दर्शित दोन अंकी कोकणी नाटक 'आत्या आत्या माका सून कर' नाटक होईल, सदर नाटक राजन पेडणेकर व यादवी राजन पेडणेकर यानी पुरस्कृत केले आहे.तरी भाविक व नाट्य प्रेमींनी उपस्थित राहून सहकार्य करावे.

हरमल नर्सिंग कॉलेजचा २६ रोजी क्रीडादिन व बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २३ : हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या कॉलेज ऑफ नर्सिंग महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा दीन व बक्षीस वितरण सोहळा शनिवार दि. २६ रोजी सकाळी १० वाजता, संस्थेच्या ज्ञानदा सभागृहात आयोजित केला आहे. ह्या सोहळ्यास प्रमुख पाहुणे माजी मुख्यमंत्री तथा संस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर तसेच खास निमंत्रित लेफ्ट डॉ अनिकेत केरकर उपस्थित राहणार आहेत.कॉलेजच्या प्राचार्य किरुबा चित्रा,इव्हेंट निमंत्रक रेमो मनोज व अंकिता मेथर सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

न्हावेली साखळीत उद्या 'पन्हाळा सांगे शौर्यगाथा'

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २३ : न्हावेली साखळी येथील श्री देव बेताळ देवाच्या स्थापनाप्रित्यर्थ शुक्रवार दि. २५ रोजी रात्री १०.३० वाजता श्री रवळनाथ भजनी मंडळातर्फे रवींद्र शिवा चोडणकर लिखित दोन अंकी ऐतिहासिक नाटक 'पन्हाळा सांगे शौर्यगाथा' सादर करण्यात येणार आहे. यात राजू रा. गावस, प्रितेश गावस, संजू गावस, निरज गावस, प्रवीण गावस, नीलेश गावस, सुंदर गावस, सुदेश गावस, रुपेश गावस, हनुमंत गावस, राघवेंद्र दामले, सनिश गावस, मिलन तोरस्कर, अद्वैत गावस, सार्थक गावस, अवनेश गावस, सार्थक गावस, सारांश गावस हे कलाकार भाग घेणार असून नाटकाचे निर्माते व दिग्दर्शक जितेंद्र गावस आहेत. तबल्यावर संगीतसाथ आदित्य तारी, संगीत दिग्दर्शक सुजन सावंत,पार्श्वसंगीत विनय गावस यांचे आहे,प्रकाश योजना विनोद गावस यांची आहे. विशेष सहाय्यक सुनील ह.गावस यांचे आहे.

ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदायातर्फे ११ मे रोजी शिर्डी येथे

टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २३ : श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदाय – मेणकुरेतर्फे साईबाबा मंदिर, शिर्डी येथे रविवार दि. ११ मे रोजी दुपारी ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सदाबहार भजनाचा भरगच्च असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम करण्यासाठी वारकरी संप्रदाय – मेणकुरेचे अध्यक्ष श्री देवानंद नाईक यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या भजन कार्यक्रमात सहभागी घेणारे गायक कलाकार – गुरुदास नाईक (कवळे – फोंडा), पांडुरंग परब (मेणकुरे), धोंडु मुळगावकर (मुळगाव) , दादु नाईक (मये), महेश शिरगांवकर (शिरगाव), गोपाळ साळगांवकर (कोलवाळ), बाबनी शेटकर (शिरोली) तसेच हार्मोनियम वादक – सिताराम कवठणकर (कोलवाळ), तबलावादक – योगेश राणे (उगाडे – दोडामार्ग), पखवाजवादक – पैल्लज शेटये (नादोडा) यांची संगीत साथ आणि साथी कलाकार म्हणून अमित शंकर नाईक, सदाशिव नाईक (मेणकुरे), नंदकुमार शेटये (पर्ये), नकुळ नाईक (मेणकुरे) व शंभु गावस (आगशी) आदी उपस्थित राहणार आहेत.

प्ले ऑफसाठी राजस्थानला विजय आवश्यक

आरसीबीही घरच्या मैदानावर विजयाचे खाते उघडण्यासाठी सज्ज

बंगळुरू, दि. २३ :

आयपीएल सामन्यात उद्या गुरुवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) राजस्थान रॉयल्स (आरआर) विरुद्ध घरच्या मैदानावर भिडणार आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने यावर्षी चांगला फॉर्म दाखवला आहे आणि आठ सामन्यांतून पाच विजय आणि १० गुणांसह पॉइंट टेबलच्या चौथ्या क्रमांकात आहे. तथापि, हे पाचही विजय त्यांच्या परदेशातील सामन्यांमध्ये मिळाले आहेत. यावर्षी त्यांनी घरच्या मैदानावर तीनही सामने गमावले आहेत आणि आता त्यांना येथे आणखी चार सामने जिंकावे लागतील, जे स्पर्धेत पुढे जाण्यासाठी खूप महत्वाचे असतील. म्हणूनच, जर आरसीबीला स्पर्धेत पुढे जायचे असेल, तर त्यांना हा सामना जिंकावा लागणार आहे.

दुसरीकडे, हा सामना जिंकून, राजस्थान रॉयल्सचा संघ प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहू इच्छितो, कारण आता पराभवही संघाच्या अडचणी वाढवेल.

याचा अर्थ असा की जर राजस्थान रॉयल्सना प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवायच्या असतील तर त्यांना प्रत्येक सामना जिंकावा लागेल. राजस्थान रॉयल्सने आठ पैकी फक्त दोन सामने जिंकले आहेत आणि पॉइंट टेबलमध्ये ते १० पैकी आठव्या स्थानावर आहेत. त्याचवेळी, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने ८ पैकी फक्त ३ सामने गमावले आहेत आणि ते १० गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहेत.

दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत खेळल्या गेलेल्या ३२ सामन्यांपैकी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १६ जिंकले आहेत तर राजस्थान रॉयल्सने १४ जिंकले आहेत, तर दोन सामने अनिर्णित राहिले आहेत.तथापि, बेंगळुरूमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यांमध्ये राजस्थान रॉयल्सचा वरचष्मा आहे, ज्यामध्ये राजस्थान रॉयल्सने ४ सामने जिंकले आहेत तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ३ सामने जिंकले आहेत, तर दोन सामने निकालात निघाले नाहीत.

या हंगामात गेल्या वेळी, जेव्हा दोन्ही संघ जयपूरमध्ये आमनेसामने आले होते, तेव्हा आरसीबीने त्यांना ९ विकेट्सच्या मोठ्या फरकाने पराभूत केले होते. राजस्थान रॉयल्स त्या पराभवाचा बदला घेण्याचे ध्येय ठेवेल, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या हंगामात घरच्या मैदानावर त्यांचा पहिला सामना जिंकण्याचा प्रयत्न करेल.

या हंगामात विराट कोहली चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्याने आठ डावांमध्ये चार अर्धशतके झळकावली आहेत. तथापि, राजस्थान रॉयल्सचा वेगवान गोलंदाज संदीप शर्मा त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता बाळगतो कारण त्याने आयपीएलमध्ये या जागतिक दर्जाच्या फलंदाजाला जास्तीत जास्त सात वेळा बाद केले आहे.तर कोहली त्यांच्यावर फक्त १६.६ च्या सरासरीने धावा करू शकतो. संदीपनंतर आशिष नेहराने कोहलीला सहा वेळा तर जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमीने आयपीएलमध्ये पाच वेळा बाद केले आहे.तथापि, कोहलीला त्रास देण्यासाठी संदीपला फॉर्ममध्ये परतावे लागेल. गेल्या तीन सामन्यांमध्ये संदीपला फक्त एकच विकेट घेता आली आहे तर या काळात त्याने खूप धावाही दिल्या आहेत.

भुवनेश्वर कुमार हा आयपीएलचा एक दिग्गज खेळाडू आहे आणि वेगवान गोलंदाजांमध्ये त्याच्याकडे सर्वाधिक १८९ आयपीएल विकेट्स आहेत. तथापि, यशस्वी जयस्वालसारखा तरुण सलामीवीर फलंदाज त्याला नेहमीच त्रास देतो. भुवनेश्वरला ८ डावांमध्ये कधीही जयस्वालला बाद करता आलेले नाही.तर जयस्वाल त्यांच्यावर १७४ च्या स्ट्राईक रेटने धावा करतो. या हंगामाची सुरुवात जयस्वालसाठी फारशी चांगली नव्हती, परंतु गेल्या तीन सामन्यांमध्ये सलग तीन अर्धशतके झळकावून त्याने दाखवून दिले की तो त्याचा आंतरराष्ट्रीय फॉर्म विसरलेला नाही. यशस्वी जयस्वालचा फॉर्म आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या प्रमुख गोलंदाजाविरुद्धचा त्याचा रेकॉर्ड पाहता, त्याचे चौथे अर्धशतक चौथ्या सामन्यात होणार आहे असे दिसते.

तथापि, जयस्वालला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या इतर दोन वेगवान गोलंदाजांपासून सावध राहावे लागेल. जोश हेझलवूडने त्याला तीन पैकी दोन डावात बाद केले आहे

संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

राजस्थान रॉयल्स : यशस्वी जयस्वाल, शुभम दुबे, रियान पराग (कर्णधार), नितीश राणा, ध्रुव जुरेल (विकेटकीपर), शिमरोन हेटमायर, वानिंदु हसरंगा, जोफ्रा आर्चर, महेश थीक्षाना, संदीप शर्मा आणि आकाश मधवाल.

आरसीबीचा संघ : फिलिप सॉल्ट, विराट कोहली, रजत पाटीदार (कर्णधार), जितेश शर्मा (यष्टीरक्षक), टीम डेव्हिड, क्रुणाल पांड्या, रोमॅरियो शेफर्ड, भुवनेश्वर कुमार, सुयश शर्मा, जोश हेजलवूड, यश दयाल. इम्पॅक्ट प्लेयर – देवदत्त पडिकल

ताळगाव : वूमन ऑफ वर्थ पुरस्कार विजेती अमिता सलत्री समवेत डावीकडून सलोनी गावकर, सुगंधा बोरकर, जमिला खान व डॉ. दिक्षा पोल.

अमिता सलत्री यांना 'वुमन ऑफ वर्थ' पुरस्कार प्राप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २३ : पर्वरी जेसी आणि ताळगाव येथील 'पांडुरंग सेल्फ हेल्प ग्रुप' यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रातील आतापर्यंत कित्येक सन्मान गौरव प्राप्त झालेल्या अभिनेत्री अमिता नायक सलत्री यांनी 'वुमन ऑफ वर्थ' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

ताळगाव येथील पंचायत हॉलमध्ये अलिकडेच आयोजित झालेल्या या खास कार्यक्रमात पांडुरंग सेल्फ–हेल्प ग्रुपच्या अध्यक्षा सुगंधा बोरकर तसेच पर्वरी जेसीच्या अ÷ध्यक्ष जमिला खान यांच्याहस्ते सलत्री यांना वरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पर्वरी जेसीच्या अ÷ध्यक्षा जमिला खान यांनी अमिता सलत्री यांच्या आतापर्यंतच्या ÷उत्तुंग कामगिरीचा आढावा घेऊन सांगितले की, त्या एक सन्मानित अशा रेडिओ, टीव्ही, नाट्य सिने कलाकार आहेत. नाट्य आणि सिने क्षेत्रात उत्कृष्ट अभिनेत्रीचा राज्य पुरस्कार ही त्यांना मिळाला आहे. शिवाय त्या एक लेखिका, वक्त्या, सूत्रसंचालिकाही आहेत. दूरदर्शन आणि एका लोकल चॅनलवरुन शंभर शंभर भागांच्या वेगवेगळ्या मालिकाही त्यांनी सादर केल्या आहेत. 'रुचीक' मालिकेचे पाचशे भाग प्रसारित झाले आहेत. त्या जेसी, रोटरी, सम्राट क्लबच्या अध्यक्षा ही होत्या. गोवा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या ग्राहक संरक्षण समितीच्या त्या अध्यक्षा आहेत. गोव्यातील ग्राहक हक्क चळवळीच्या त्या प्रमुख कार्यकर्त्या आहेत. त्यांची ही दैदित्यमान कामगिरी पाहून 'वूमन ऑफ वर्थ' हा त्यांना पूर्णपणे वर्थ असलेल्या कामगिरी असलेला पुरस्कार देताना आम्हाला खूप अभिमान आणि आनंद वाटत आहे.

सुगंधा बोरकर यांनी सलत्री बद्दल आम्हा सर्वांना खूपच जिव्हाळा आहे. त्यांचे कार्य अतुलनीय आहे. असे म्हटले. सलत्री यांनी सत्काराला उत्तर देताना म्हटले की, तुम्हा सर्वांचे सदोदीत मिळणारे अखंड प्रेम आणि आतापर्यंत मला मिळालेले सारे पुरस्कार, गौरव म्हणदे ही सारी देवाचीच कृपा आहे. जिल्हा परिषदेच्या सदस्य अंजली नाईक उपस्थित होत्या. सलत्री यांच्या हस्ते समाजसेविका रेखा नारायण पाटील, सौ. रेखा यांना सन्मानित करण्यात आले. जेसी सदस्य सलोनी गावकर यांनी आभार मानले.

विविधा कर्मचारी पतसंस्थेचा अभ्यास दौरा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २३ : नावेली साखळी येथील विविधा उच्च माध्यमिक विद्यालतील विविधा कर्मचारी पतसंस्थेचा तीन दिवशीय अभ्यास दौरा मोठ्या उत्साहात झाला. या अभ्यास दौऱ्यात एकूण २८ सभासद सहभागी झाले होते. सर्वप्रथम या अभ्यास दौऱ्यात सिंधुदुर्ग जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित, सिंधुदुर्गनगरी आणि रत्नागिरी जिल्हा प्रार्थमिक शिक्षक पतपेढी मर्यादित रत्नागिरी या दोन संस्थांना भेट देण्यात आली.

यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित संस्थेत ऋतुजा जंगले (संचालिका), समीर नातू (संगणक तज्ज्ञ), चंद्रसेन पाताडे (संचालक), मनोज सावळ (अकाउंटंट) यांचे मार्गदर्शन लाभले.तर रत्नागिरी जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित रत्नागिरी या संस्थेत हरीश देसाई (कार्यलक्षी संचालक), विलास बांडागळे (अकाउंटंट) यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी ठेव तारण कर्ज, जामीन तारण कर्ज, शैक्षणिक कर्ज,वाहन,सुवर्ण व गृहपयोगी वस्तू खरेदी इ. अनेक उपक्रमावर चर्चा झाली. सर्व सभासदांच्या समस्यांचे यावेळी निरसन करण्यात आले.विविधा कर्मचारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष एकनाथ मांद्रेकर,उपाध्यक्ष सागर परवार,सचिव नस्सीमा बी खान, खजिनदार राखी शिरोडकर, संचालक रामा नाईक यांच्या अथक परिश्रमाने आणि मार्गदर्शनाने हा अभ्यास दौरा अतिशय आनंदात आणि उत्साहात झाला.

हा दौरा यशस्वी करण्यासाठी निबंधक कार्यालय पणजी आणि निबंधक कार्यालय डिचोली यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळाले. त्याचप्रमाणे विविधा परिवाराचे व्यवस्थापक प्रताप गावस, अध्यक्ष सुरेश गावस, गुरूदास गावस मेमोरियल हायस्कूलच्या व्यवस्थापिका सौ.गीता गावस, प्राचार्य रमेश सिनारी यांचेही प्रोत्साहन लाभले. या दौऱ्याच्यावेळी सर्व सभासदांनी थीबा राजवाडा, कुळणेश्वर मंदिर, रत्नादुर्गा किल्ला, लोकमान्य टिळक निवासस्थान, गणपतीपुळे या स्थळांना भेट देऊन पुरेपूर आनंद लुटला. कार्यक्रमाचा वेळी अध्यक्ष एकनाथ मांद्रेकर यांनी स्वागत व प्रास्तविक केले. राखी शिरोडकर यांनी सूत्रसंचालन तर सागर परवार यांनी आभार प्रदर्शन केले.

सिंधुदुर्ग : जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीच्या भेटीवेळी ऋतुजा जंगले, समीर नातू, चंद्रसेन पाताडे, मनोज सावळ व विविधा कर्मचारी पतसंस्थेचे सभासद.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 231 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .